**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**परिपत्रक क्र.४/सामान्य प्रशासन विभाग/२०२२/**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ परिसर संरक्षणासाठी **मे.संजय कुमार शुक्ला सेक्युरिटी एजन्सी, मुंबई या कंत्राटदारामार्फत दि.०१/०८/२०२१ पासुन** कार्यरत सुरक्षा रक्षक आणि सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागाच्या स्वच्छतेसाठी **मे.डी.एम.एन्टरप्राईजेस, वाशी, नवी मुंबई या कंत्राटदार एजन्सीमार्फत दि.०२/०८/२०२१ पासुन** कार्यरत कंत्राटी सफाई कामगारांना कळविण्यात येते की, सदरील कंत्राटदारामार्फत अदा होणाऱ्या मासिक वेतन, पी.एफ., ई.एस.आय.सी, पी.टी. व एल.डब्ल्यू.एफ. बँक आरटीजीएस चार्जेस किंवा इतर वेतनविषयक बाबत काही आक्षेप/तक्रार असल्यास लेखी स्वरूपात आक्षेपांच्या पुष्ठयर्थ पुराव्यासह वेतन अदा झाल्यानंतर सात दिवसांच्या आत त्या-त्या महिन्यात वेळेवर सामान्य प्रशासन विभागात सादर करावे. जेणेकरून त्या बाबत संबंधीत कंत्राटदार एजन्सी यांच्याकडून लगेच पूर्तता करण्याबाबत कार्यवाही करता येईल. याबाबत कोणत्याही सुरक्षा रक्षक/कंत्राटी सफाई कामगाराने वेळेवर लेखी आक्षेप सादर केले नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार आणि संबंधित सुरक्षा रक्षक/कंत्राटी सफाई कामगार यांची राहील, त्यास विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, विभागात सदरील कंत्राटदार एजन्सीमार्फत कार्यरत सर्व सुरक्षा रक्षक/कंत्राटी सफाई कामगार यांच्या निदर्शनास त्यांनी सदर परिपत्रक आणून द्यावे.

विद्यापीठ प्रांगण )(
औरंगाबाद ४३१००४ )(
संदर्भ:सामान्य प्रशासन विभाग २०२२-२३/1525 )(
दिनांक: २९/०४/२०२२ )(

प्र. कुलसचिव 29/4

**या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :-**

१. संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, उस्मानाबाद
२. सर्व संचालक/विभागप्रमुख, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. प्राचार्य, मॉडेल कॉलेज, घनसावंगी, जि.जालना.
४. संचालक, युनिक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात यावे.
५. मे.डी.एम.एन्टरप्राईजेस, वाशी, नवी मुंबई.
६. मे.संजय कुमार शुक्ला सेक्युरिटी एजन्सी, गोरेगाँव पूर्व-मुंबई.